# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 09/12/2021 (गुरूवार)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावरील मकरधोकडा येथे दिनांक 08/12/2021 चे 00.05 वा. ते 00.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा. इंदिरा सुखेदव बेलखुडे वय 60 वर्ष रा. मकरधोकडा उमरेड व त्यांची सुन नामे– रोशनी बेलखुडे या पहील्या रूममध्ये झोपल्या होत्या. दि 08.12.21 रोजी 00.15 वा. सुमारास फिर्यादीला बाथरूम लागल्याने घराचे समोरील रूमचा लाईट सुरू केला. तेव्हा रूम मधील दिवानच्या बाजुच्या भिंती जवळ घरा शेजारी राहणारा आरोपी नामे– योगेश आंबुलकर हा बसलेला दिसला तेव्हा फिर्यादीने त्याला 'कायले आला तु, तुझे हे बरोबर आहे का'? असे म्हटले असता तो म्हणाला की, 'तु बोंबलु नको, तुया सुनले मारीन नाहीतर तुले मारीन कल्ला केला तर' असे म्हणुन दिवानवर ठेवलेला लाकडी दांडा असलेला लोखंडी घन हातात घेतला दोन्ही हाताने उचलुन मारल्याने फिर्यादी स्वताचा बचाव केला असता त्याच्या हातातील लोखंडी घन उजव्या डोळयाच्या वरती भुवई जवळ लागुन रक्त निघाले व रूमच्या आतमध्ये धक्का दिला. तेव्हा खोलीच्या दरवाजा फिर्यादीच्या हाताच्या अंगठयाला लागल्याने रक्त निघाले तेव्हा फिर्यादीने त्याला ढकले असता त्याने फिर्यादीची सुन रोशनी हिच्या छातीवर व डोक्यावर घन मारल्याने तिला गंभीर जखम होउन रक्त निघाले. सुनेला उपचाराकरीता प्राथमीक आरोग्य केंद्र मकरधोकडा येथे नेले पुढील उपचाराकरीता नागपुर येथे रेफर केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 307, 455, 324,506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राजीव लोले मो ंन 8080290801 हे करीत आहे.

यानंतर दिनांक 08/12/2021 चे 12.00 वा. ते दिनांक 08/12/2021 चे 14.00 वा. सुमारास निखिल नारायण आंबुलकर वय 48 वर्ष रा मकरधोकडा यांचा मोठा मुलगा आरोपी नामे– योगेश निखिल आंबुलकर (मृतक), वय 21 वर्ष याचे शेजारी राहणारी महेंद्र सुखदेव बेलखुडे याची पत्नी रोशनी बेलखुडे हिच्या सोबत प्रेमसंबंध होते त्यावरून या दोन्ही घरामध्ये वाद झाला होता. तेव्हा पासुन ते एकमेकांशी बोलत नव्हते तरी योगेश आंबुलकर हा दि 08/12/21 रोजी रात्रीच्या वेळी शेजारी राहणारे महेंद्र बेलखुडे यांची आई इंदिरा व पत्नी रोशनी यांना मारहाण करून स्वताच सरकारी विहीरीमध्ये उडी घेउन विहीरीचे पाण्यात बुडुण मरण पावला. सदर प्रकरणी पो.स्टे. उमरेड येथे मर्ग क्र. 70/2021 कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि राजीव लोले मो ंन 8080290801 हे करीत आहे

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील रिधोरा येथे दिनांक 07/12/2021 ते दिनांक 0/12/2021 चे 07.30 वा. चे 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– चंदु शालीकराम ठाकरे वय 42 वर्ष रा. रिधोरा ता. काटोल जि. नागपुर यांचे घराचे दाराचे कुलूप अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील नगदी 3,000/–रू. व पर्स मध्ये ठेवलेले बेन्टेक्स ची पोत अंदाजे किमंत 200/– रू.तसेच गावात राहणारी सासु चंद्रकला मुसळे यांच्या कडील 4 ग्रॅम डोरल्याचे सोन्याची गरसोळी अंदाजे किंमत 2,000/– रू. व नगदी 4,000/–रू. तसेच प्रणव चंदुजी पवार यांचे हार्डवेअर दुकानातील काउॅन्टरमधील नगदी 3,000/–रू. असे एकुण कि. 12,200/–रू. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 07/12/2021 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 30 वर्ष हिच्या पती सोबत आरोपी नामे– रोहीत विशाल शेंडे, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, खापरखेडा याची ओळख असल्याने घरी येणे जाणे करीत होता. फिर्यादी ही आपल्या मुलास घेण्याकरीता शाळेत गेली असता रस्त्यात आरोपी हा आडवा होवुन अश्लील शब्द बोलुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर आरोपीने 'तुझा फोटो माझ्या मोबाईल मध्ये आहे, मी वायरल करीन' असे म्हणुन फिर्यादीस गालावर दोन थापड मारली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354,323 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जानुसिंग जाधव मो न 9923104310 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत शिक्षक कॉलोनी वार्ड क्र 3 पाटणसावंगी त. सावनेर येथे दिनांक 08.12.2021 चे 09.00 वा. दरम्यान सौ. अनिता विनोद ठाकरे (मृतक), वय 30 वर्ष, रा. शिक्षक कॉलोनी वार्ड क्र 3 पाटणसावंगी त. सावनेर हीचे तीचे सासू सोबत घरगूती कारणावरून भांडण झाल्याने तिने रागाचे भरात घरातील गव्हाच्या कोठीमध्ये ठेवलेले सेल्फॉस कंपनीचे नावाचे विषारी औषध प्राषण केले उपचारा दरम्यान मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद योगीराज ठाकरे, वय 42 वर्ष रा. शिक्षक कॉलोनी वार्ड क्र 3 पाटणसावंगी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नागरे मो.क्र 9011596500 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर